पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल **sp.washim@mahapolice.gov.in**
**Website:-www.washimpolice.gov.in**
प्रेस नोट

दिनांक :– २४/११/२०२१

# वाशिम जिल्हयातील श्वान पथकात २०१७ पासुन कार्यरत असलेल्या गुन्हे शोधक श्वान लुसी हिचे तपास कामात उत्कृष्ट योगदान.

वाशिम जिहयातील गुन्हेगारीवर आळा बसावा याकरीता वेगवेगळया उपाययोजना राबवुन गुन्हे उघडकीस आणण्याकरीता अधिकारी/अंमलदार तपास कामात आपआपले कौशल्य पणाला लावुन तात्रिंक मदतीच्या सहाय्याने खुन,दरोडा,जबरी चोरी सारखे गंभीर गुन्हे उघडकीस आणतात.

वाशिम जिल्हयात सन २०१७ साली गुन्हे शोधक श्वान म्हणुन प्रशिक्षण करून लुसी जिल्हयात दाखल झाली. डॉग हॅन्डलर पोहवा शेजुळकर यांचेसह लुसी हिने आपले प्रशिक्षण पणाला लावुन २०१७ साली पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथील अपक्र ३२२/१७ कलम २९५ भादवी ग्राम चांदई येथे बौधपुरा येथील झेंडयाला चप्पल बांधुन विटंबना केली त्या गुन्हयात चप्पल बांधलेल्या सुतळीच्या गाठीच्या वासावरुन आरोपीचे घर दाखवुन ओळख परेड दरम्यान आरोपी शोधुन गुन्हा उघडकीस आणला. सन २०१८ मध्ये पोस्टे वाशिम शहर अपक्र ३८९/१८ कलम ४५७,३८० भादवी मध्ये दुकानातील पेनस्टॅन्ड व लोखंडी हुकच्या वासावरुन आरोपीचे घर दाखवुन गुन्हा उघडकीस आणला तर पोलीस स्टेशन रिसोड ग्राम महागाव येथील ३६७/१८ कलम ३९५,४२७ भादवी मध्ये डॉग हॅन्डलर पोहवा शेजुळकर यांनी लुसीला चाबिचा वास दिला लुसिने घटनास्थळावरुन माग काढत दिड किलोमिटर अंतर कापुन आरोपीची ओढणी शोधुन गुन्हा उघडीकस आणला. सन २०१८ मध्ये मिसिंग २३/१८ मध्ये नामे आसीफ खान माजी सरपंच वाडेगाव यांची मिसिंग अकोला येथे दाखल झाली श्वान पथकास कॉल मिळाल्यावर डॉग हॅन्डलर शेजुळकर यांनी श्वान लुसी हिने म्हैसाळा ते मुर्तीजापुर नदीच्या काठालगत माग काढत गाडीतील मिसिंग व्यक्तीच्या कपडयाच्या कॉलर व शर्टाच्या बाहीच्या वासावरुन तपास अधिकारी यांना पुलावरुन माग दाखवित घटनास्थळी नेऊन भुंकुन मिसिंग व्यक्तीला मारुन टाकलेल्या ठिकाण दाखवुन कौतुकास्पद कामगिरी केली. पोलीस स्टेशन शिरपुर येथील अपक्र १२२/१८ कलम ४६१,३८० मध्ये आरोपीने गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम मशीन कट करुन चोरीचा प्रयत्न केला त्या ठिकाणी पारधी आरोपीचे घर दाखवुन मोलाची कामगिरी पार पाडली

सन २०१९ मध्ये वाशिम ग्रामीण ४७/१९ कलम ३६३,३०२ भादवी ग्राम रिठद येथील मृतक ९ वर्षीय मुलाच्या शाळेच्या ड्रेसचा वास लुसीला दिला असता श्वान लुसी हि मृतक मुलाच्या घरातुन बाहेर निघुन माग काढीत आरोपीचे घर दाखवुन गुन्हा उघडकीस आणला. सन २०१९ मध्ये मंगरुळपीर अपक्र १७४/१९ कलम ३८०,४२७ मध्ये स्टेट बॅक ऑफ इंडीया या शाखेचे एटीएम मशीनच्या गुन्हयाचा तपासामध्ये डॉग हॅन्डलर शेजुळकर यांचे सहाय्याने श्वान लुसीने योग्य रित्या मार्गदर्शन करुन मोलाची कामगिरी पार पाडली.

पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

प्रेस नोट

सन २०२० मध्ये पोलीस स्टेशन शिपुर जैन ग्राम दुधाळा येथे अपक्र २३७/२०२० कलम ३०२,१२० ब,२०१,३४ भादवी सह कलम ४,२५ आर्म भारतीय हत्यार कायदा अन्वये दाखल गुन्हयात एका बटनाचे वासावरुन गर्दीत उभ्या असलेल्या व्यक्ती जवळ जावुन भुंकली तपास अधिकारी यांनी नमुद आरोपीस ताब्यात घेऊन गुन्हा उघडकीस आणला. तर पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण ग्राम अडगाव खुर्द येथील अपक्र ५०३/२०२० कलम ३०२ भादवी या गुन्हयाचे तपासात काचेच्या बांगडीच्या दोन तुकडयाच्या आधारावर महिला आरोपी शोधुन दिली व गुन्हा उघडकीस आणला. पोलीस स्टेशन अनसिंग अपक्र २०/२० कलम ३०२,२०१,३४ भादवी या गुन्हयात चार्जिंग बॅटरी व गोलाकार दगड याचे वासावरुन आरोपीचे घर दाखविले.

सन २०२१ मध्ये पोस्टे मालेगाव ग्राम नागरतास अपक्र ८५/२१ कलम ३०२ भादवी मध्ये महिलेचा गळा आवळुन खुन करण्यात आला होता. डॉग हॅन्डलर शेजुळकर यांनी साध्या दोरीच्या वास श्वान लुसी हिला दाखविला असता आजुबाजुच्या परिसरात माग घेऊन आरोपीचे घरी जाऊन आरोपी ओळखुन तपास कामात मोलाची कामगिरी केली.

वाशिम पोलीस दलातील गुन्हे शोधक श्वान लुसी हिने डॉग हॅन्डलर शेजुळकर यांचे सह खुन, दरोडा, जबरी चोरी, धार्मिक स्थळाची विटंबना, अशा प्रकारच्या गंभीर गुन्हयाची उकल करण्यात कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

एवढेच नव्हे तर श्वान लुसी हिने आज पर्यंत अमरावती परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा (स्पर्धा) मध्ये गोल्ड मेडल पटकावले असुन महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळावा स्पर्धा पुणे येथे सुध्दा गुन्हे शोधक या स्पर्धेत गोल्ड मेडल मिळविले आहे. तर पंजाब राज्यात हरियाना येथे होणाऱ्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा या स्पर्धे करीता श्वान लुसी हिची निवड झालेली आहे.

मा. श्री.बच्चन सिंह पोलीस अधिक्षक वाशिम यांनी संपुर्ण डॉग युनिट तसेच श्वाान लुसी हिच्या कामगिरी बददल कौतुक केले असुन पुढेही अशाच प्रकारच्या भरीव कामगिरी करुन वाशिम जिल्हयास नावलौकीक मिळवुन दयावी अशी आशा व्यक्त केली आहे.

पोलीस निरिक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम